परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/३४२/२०२०
दिनांक - :०९/०६/२०२०

प्रति,

मुख्याध्यापक / प्रमुख्याध्यापक.,
माध्यमिक विद्यालये..............
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

विषय – सन - २०२० – २०२१ करीता शिक्षक मागणी तसेच शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी पटसंख्या व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थिती बाबत.......

२/- उपरोक्त विषयास अनुसरून कोरोना ( COVID-19) या संसर्गजन्य आजारामुळे शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधील इ. ०५ वी ते ०९ वी मधील विद्यार्थ्याच्या दुस-या सत्रातील परीक्षा झालेल्या नाहीत.तरी महाराष्ट्र शासन शिक्षण विभागामार्फत इ. ५ वी ०८ वी पर्यतचे सर्व विद्यार्थी पास करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.त्यानुसार ०५ वी ते ८ वी विद्यार्थी पास करणेत आलेले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ हे सदर शैक्षणिक वर्ष कोरोना ( COVID-19) या संसर्गजन्य आजारामुळे कधी सुरू होणार आहे, याबाबत महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाने आज अखेर कोणत्याही सुचना दिलेल्या नाहीत, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचारी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे दरवर्षी माध्यमिक शिक्षणविभागात मानधन किंवा तासिका शिक्षक नेमणूका विद्यालयाच्या मागणीनुसार कराव्या लागतात त्यास प्रशासकीय मान्यता आवश्यक असते, त्याकरीता विद्यालय वाईज विद्यार्थी पट संख्या निश्चित असणे आवश्यक आहे.

सद्य स्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय व विभागीय सर्व कार्यालये १००% उपस्थिती बाबत मा.आयुक्त,सो.यांनी आदेश निर्गत केलेले आहेत.त्यानुसार विद्यालयातील शिक्षकांनी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यालयात १००% उपस्थित राहणे आवश्यक आहे.विद्यालयात शिक्षकांनी उपस्थित राहुन खालील प्रमाणे कामकाज करणेत यावे.

१) विद्यार्थी पटसंख्या बाबत विद्यालयाच्या परिसरात सर्व्हे करणेत यावा,रोज केलेल्या कामाचा गोषवारा विद्यार्थी पालकांच्या भेटी पत्ते मो.नंबर सह विद्यालयाच्या कार्यालयात मुख्याध्यापक यांच्याकडे सादर करणेत यावा.
२) विद्यालयातील मागील चालु सर्व शैक्षणिक / प्रशासकीय कामकाज पुर्ण करून घेणेत यावे.
३) शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करीता गुणवत्ता वाढ विद्यार्थी पटसंख्या वार्षीक नियोजन करणे.
४) मुख्याध्यापक विद्यालयातील शैक्षणिक / प्रशासकीय सांगतील ते कामे पुर्ण करून घेणेत यावीत.

या परिपत्रकान्वये सर्व मुख्याध्यापक,प्र.मुख्याध्यापक यांना कळविणेत येते की प्रशासन विभागाकडील आदेश क्र.प्रशा/०१/कावि/९०८/२०२० दि.२६/०५/२०२० अन्वये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती बाबत कार्यवाही करणेत यावी.तसेच विद्यालयातील शिक्षक कर्मचारी यांच्याकडुन विद्यालयाचे शैक्षणिक/प्रशासकीय सर्व कामकाजाचे नियोजन करून कामकाज करून घेणेत यावे.जे शिक्षक कर्मचारी गैरहजर राहतील त्यांची विनावेतनी किंवा रजा खतवणेत यावी.तसेच शिक्षक कामकाज करणार नाहीत, त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून मुख्यकार्यालयास अहवाल सादर करणेत यावा.याबाबत कोणत्याही शिक्षक कर्मचारी यांची तक्रार येऊन देऊ नये.
शिक्षक कर्मचारी यांची उपस्थिती बाबत दि.११/०६/२०२० पासुन प्रशासन विभागाच्या आदेश क्र.प्रशा/०१/कावि/९०८/२०२० दि.२६/०५/२०२०अन्वये कार्यवाही करणेत यावी.

सर्व विद्यालयाकडुन विद्यार्थी पटसंख्या बाबत माहीती व शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करीता शिक्षक मागणी विहित नमुण्यात दि.२३/०६/२०२० पर्यत कळविणेत यावी,सदर माहीती उर्दु व मराठी माध्यमांची वेगळी पाठवणेत यावी. मुदतीनंतर माहीती प्राप्त झाल्यास त्या विद्यालयास शिक्षक मिळणार नाहीत,त्यास संबधीत कर्मचारी जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे १८ -

सोबत ,विहित नमुणा